ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 11 | August - 2016

Review Of Research

# नंदुरबार जिल्हयातील स्थलातंरीत आदिवासी श्रमीकांच्या समस्याः

**प्रा.डॉ. डी.जी. पाटील**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जी.टी. पाटील महाविदयालय,नंदुरबार.**



**सारांशः-**

प्रस्तुत शोधनिबंध नंदुरबार जिल्हयातील सर्व सहाही तालुक्यातुन होणाऱ्या आदिवासीच्या स्थलांतरामुळे आदिवासींना त्याच्या कुटूंबाला भोगाव्या लागणाऱ्या समस्यावर प्रकाश टाकणारा आहे. जिल्हयातील जवळ-जवळ ६०% आदिवासी कुटूंबांना पोटाची खळगी भरण्यासाठी हंगामी स्थलांतर करावे लागते. स्थानिक ठिकाणी व स्थलांतराच्या ठिकाणी अनेक समस्यांना सामोरे जाऊन अतोनात कष्ट करावे लागतात शोषण, व्यासनाधिनता, मुलाबाळांच्या संगोपणाकडे दुर्लक्ष, मुलाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष, आरोग्याकडे दुर्लक्ष, अशा अनेक समस्यांचा अभ्यास करुन स्थलांतर रोखण्यासाठी काही उपाय-योजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीजशब्दः-** स्थलांतर, समस्या, कुटूंब, दारिद्री

**प्रस्तावनाः-**

नंदुरबार जिल्हयातील सहाही तालुक्यातुन (अक्कलकुवा, अक्राणी, धडगांव, शहादा, तळोदा, नवापुर) तालुक्यातील आदिवासी कुटूंबे मोठया प्रमाणावर स्थलांतर करताना दिसुन येतात. साधारणत ऑक्टोबर महिन्यापासून आदिवासींची स्थलांतरासाठीची लगबग सुरू होते. ऑक्टोबर ते मे या कालावधीत आदिवासी मंजूर गुजरात राज्यात कामासाठी स्थलांतर करतात. जिल्हयातील अनेक आदिवासी कुटूंबे कायम स्वरूपी जिल्हयातुन स्थलांतरीत होऊन नवीन इमारत बांधकाम व्यवसायात मजुरी करतात. काही कुटूंब शेती व्यवसायात मजुरी करीत असतात.

नंदुरबार जिल्हयाची निर्मिती १ जुलै १९९८ रोजी झाली. नंदुरबार जिल्हयाची निर्मिती झाल्यानंतर अनेक प्रशासकिय कार्यालये जिल्हयात सुरू झाले त्याच्या माध्यमातुन जिल्हयातील समस्या कमी करून जिल्हयाचा विकास साधण्यासाठी प्रयत्न होऊ लागले. पण आजही जिल्हयातील आदिवासी समाजाच्या मुख्य समस्या कमी झालेल्या नाहीत. त्यामुळे या समाजातील दारिद्रय, बेरोजगारी कुपोषण यासारख्या समस्या पूर्ण कमी होऊ शकलेल्या नाहीत. पर्यायाने रोजगारासाठी जिल्हयातील आदिवासी लोकांना मोठया प्रमाणावर स्थलांतर करावे लागत असते.

सन २०११ च्या जनगणनेनुसार नंदुरबार जिल्हयातील लोकसंख्या १६ लाख आहे. त्यापैकी ६९% लोकसंख्या आदिवासी आहे. नंदुरबार जिल्हयात आदिवासीची संख्या मोठया प्रमाणावर असून या बाबतीत जिल्हयाच्या राज्यात चौथा क्रमांक आहे. परंतू मावन विकास अहवालानुसार जिल्हयाच्या नंदुरबार जिल्हा व आदिवासीचे स्थलांतर असे समीकरणच झाल्याचे दिसून येते. जिल्हयातील भौगोलिक परिस्थिती, शेती, शासनाचे उदासिनता, भ्रष्टाचार शोषण, रोजगार, हमी योजनेचे उपयश, रोजगारासाठी ठोस उपाय योजना नसणे इ. मुळे परराज्यांत स्थलांतर हे आदिवासी मजुरांच्या उदरनिर्वाहासाठी तो एक पर्याय म्हणून स्विकारतात.

**संशोधनाची उद्दिष्टेः-**

१. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी मजुराच्या स्थलांतर विषयी समस्याचे अध्ययन करणे.
२. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी समाजातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची समस्याचा अभ्यास करणे.
३. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी मजुराच्या स्थलांतराची समस्या कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहितकेः-**

१. नंदुरबार जिल्हयातुन आदिवासी कुटूंबालाच मोठया प्रमाणात परराज्यात स्थलांतर करावे लागते.

२. जिल्हयात रोजगार मिळविण्याची शाश्वती नसलयाने व परराज्यात जास्त मजुरी मिळत असल्याने स्थलांतर होते.
३. पुरूषाबरोबर स्त्रीयांनीही स्थलांतर करणे ही पिढयानं पिढया चालत आलेले प्रथा आहे.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व व्दितीय साधन सामग्रीचा वापर केला असून प्राथमिक साधनात स्थलांतरीत झालेल्या कुटूंबाशी चर्चा, निरिक्षणे केली आहेत. व्दितीय साधन सामग्रीत विविध संदर्भ ग्रंथ अहवाल, मासिके, वर्तमानपत्र, वेबसाईट यांचा आधार घेण्यात आला आहे.

नंदुरबार जिल्हयाची निर्मिती १ जुलै १९९८ मध्ये झाली. नंदुरबार जिल्हयाने राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी १.६०% म्हणजेच ४.९३३ किलोमीटर क्षेत्र व्यापले असून राज्यात क्षेत्रफळाच्या क्रमवारीमध्ये जिल्हयाचे ३० व्या क्रमाकांचे स्थान आहे. या जिल्हयात ६९% लोकसंख्या अनुसूचित जमाती म्हणजे आदिवासी आहे. त्याचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती व्यवसाय सुध्दा परपरांगत पध्दतीने केला जातो. त्यामुळे या समाजात दारिद्रय, बेकारी, कृपोषण यासारख्या समस्या जास्त आढळतात.

**तक्ता क्र:१**

जिल्हयातील ग्रामीण भागातील तालुकानिहाय दारिद्रय रेषेखालीलआदिवासी लोकसंख्येचे प्रमाण (२०१४-१५)

| अ.क्र | तालुका | दारिद्रय रेषेखालील कुटूंब | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण कुटूंबाची एकुण संख्या | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर | एकुण | अनुसूचित जमातीची दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची टक्केवारी |
| १ | अक्कलकुवा | ३६६६७ | १२६ | २८४०२ | १७७० | ३०२९८ | ९३.७४ |
| २ | अक्राणी | २५७७५ | १८७२ | १९५८४ | १९८ | २१६५४ | ९०.४४ |
| ३ | तळोदा | २२४१७ | २५६३ | १३२३५ | ११७९ | १६९७७ | ७७.९५ |
| ४ | शहादा | ६४०३१ | ४२५८ | २९३९७ | ७६१० | ४१२६५ | ७१.२३ |
| ५ | नंदुरबार | ४७१५५ | २७२५ | २१८२५ | ७५७२ | ३२१२२ | ६७.९४ |
| ६ | नवापुर | ४७२५९ | १०५ | ३२४५६ | ४६३ | ३३०२४ | ९८.२८ |
| | **एकूण जिल्हा** | **२४३३०४** | **११६४९** | **१४४८९९** | **१८७९२** | **१७५३४०** | **८२.६३** |

**संदर्भ:-** नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

वरील सारणीत २०१४-१५ मधील एकुण ग्रामीण क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबात प्रत्येक तालुका निहाय अनुसूचित जमातीतील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण विचारात घेतले आहे.

अक्कलकुवा तालुक्यात २०१४-१५ मध्ये ग्रामीण भागात एकूण ३०२९८ कुटूंब दारिद्रय रेषेखाली होते. यात आदिवासी कुटूंबाची संख्या २८४०२ आहे. अक्कलकुवा तालुक्यात एकूण दारिद्रय रेषेखालील कुटूंबात आदिवासी कुटूंबाचे शेकडा प्रमाण ९३.७४ इतके आहे.

अक्राणी तालुक्यात २०१४-१५ यावर्षी ग्रामीण भागात एकूण २१६५४ कुटूंब दारिद्रय रेषेखाली होते. यात आदिवासी जमातीच्या कुटूंबाची संख्या १९५८४ इतकी आहे. तालुक्यात एकूण दारिद्रय रेषेखालील कुटूंबात आदिवासी कुटूंबाचे प्रमाण ९०.४४% आहे.

याप्रमाणे तळोदा तालुक्यात एकुण ग्रामीण भागातील रेषेखालील कुटूंबात आदिवासी कुटूंबाचे शेकडा प्रमाण ७७.९५% आहे. तर शहादा तालुक्यात ७१.२३% नंदुरबार तालुक्यात ६७.९४% आणि नवापुर तालुक्यात ९८.२८% आहे.

नंदुरबार जिल्हयात ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची संख्या १७५३४० संख्या १४४८९९ इतकी आहे. याचे प्रमाण ८२.६३% आहे. म्हणजेच जिल्हयातील एकूण दारिद्रय रेषेखालील कुटूंबात आदिवासी कुटूंबाचे प्रमाण जास्त आहे. म्हणून या समाजात रोजगारासाठी स्थलांतराची समस्या निर्माण होते.

**तक्ता क्र:२** स्थलांतर केलेल्या आदिवासी मजुराची प्रतिकुटूंब सरासरी संख्या.

| अ.क्र | जमात | स्थलांतर केलेल्या कुटूंबाची संख्या | स्थलांतर केलेल्या कुटूंबातील मजुरांची संख्या | स्थलांतर केलेल्या मजुराची प्रती कुटूंब सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | भिल्ल | ९५ | ५०५ | ५.३ |
| २ | पावरा | ८६ | २९४ | ३.४ |
| ३ | धानका | ४५ | १०४ | २.३ |
| ४ | गावीत | ३६ | ७६ | २.१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | मावची | ९७ | ७५ | २.७ |
| ६ | कोकणा | ११ | २४ | २.१ |
| | **एकूण** | **३००** | **१०७२** | **३.६** |

**संदर्भ:-** आर्थिक सामाजिक समालोचन नंदुरबार जिल्हा

तक्ता क्र:२ वरुन स्पष्ट होते की, स्थलांतर केलेल्या आदिवासीच्या वेगवेगळया जमातीतील प्रतिकुटूंब मजुरांची सरासरी संख्या ३.६ इतकी येते. सर्वात जास्त मजुरांची सरासरी भिल्ल या जमातीची ५.३ इतकी आहे. व सर्वात कमी मजुरांची सरासरी संख्या व कोकणा व धानका या जमातीची २.१ इतकी आहे. यावरून स्पष्ट होते की भिल्ल जमातीला रोजगारासाठी अधिक सदस्यासहीत स्थलांतर करण्याची आवश्यकता निर्माण होते व त्याची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्या खालोखाल परिस्थिती पावरा या जमातीची आहे. या जमातीतील स्थलांतर प्रतिकुटूंब सरासरी संख्या ३.४ इतके आहे.

## नंदुरबार जिल्हयातील आदिवासीच्या स्थंलातराची कारणे:-

नंदुरबार जिल्हयातील स्थलांतरीत आदिवासीच्या समस्यांच्या अध्ययनावरून स्थलांतराची काही प्रमुख कारणे समोर येतात.

### १) रोजगार:-

पोटाची खळगी भरण्यासाठी रोजगार मिळणे काही ना काही काम मिळणे आवश्यक असते. परंतू जिल्हयात कारखाने व उदयोग धंदे नसल्याने रोजगार नाही. जिल्हयातील अक्कलकुवा, अक्राणी, या तालुक्यातील शेत जमीन डोंगराळ आहे ही शेत जमीन चढउताराची आहे. तसेच पावसाच्या लहरीपणामुहे कृत्रिम जलसिंचणाच्या अपुऱ्या सोयीमुळे शेत मजुरांना २ ते ३ महिनेच काम उपलब्ध होते.

### २) दारिद्रय:-

कमालीची गरीबी उत्पन्न, मिळविण्याच्या साधनाच्या अभाव कोणतीही संपत्ती नसणे शेत जमिनीचे अत्यल्प प्रमाण किंवा भुमिहीनता यामुळे अन्न, वस्त्र, व निवारा यासारख्या मुलभूत गरजा ही जिल्हयातील आदिवासीच्या भागत नाही म्हणून स्थलांतर होते.

### ३) मजुरी:- (उत्पन्न)

जिल्हयातील कामाच्या ठिकाणी किंवा स्थानिक ठिकाणी मिळणारी मजुरी अत्यंत कमी असते जिल्हयात मजुरी ५० ते ६० रुपये तर जास्तीत जास्त १०० रूपये मिळते. परंतू स्थलांतराच्या ठिकाणी प्रती व्यक्ती २०० ते २५० रूपये मजुरी मिळते.

### ४) कामाची शाश्वती:-

स्थानिक ठिकाणी उपलब्ध होणारे काम पुरेसे नसते मिळणाऱ्या रोजगारामुळे जिल्हयातील आदिवासी मजुरांचे पोटाचा अन्नाचा प्रश्न मिटत नाही. तर स्थलांतर ठिकाणी कामाची हमी नसते. सरासरीने विचार केल्यास प्रत्येक मजुराला वर्षभरात १०० दिवसापेक्षा जास्त काम उपलब्ध होते. काही कुटूंबाना वर्षभर काम उपलब्ध होते.

### ५) आगाऊ रक्कम:-

आदिवासी मजुरांना/कुटूंबाना परत येतांना मालकाकडून किंवा ठेकेदाराकडून ठरावीक प्रमाणात उचल ॲडव्हान्स मजुरी मिळते त्यामुळे पावसाळा व रिकाम्या वेळेतील उपासमारी टळते.

### ६) शासकिय योजनाचे अपयश:-

महाराष्ट्र शासन/ जिल्हा प्रशासना मार्फत जिल्हयात रोजगार हमी योजना राबविली जाते. जिल्हयात २३०० कामे मंजूर केलेली आहेत. धडगांव ६५० कामे, अक्कलकुवा २८३ , शहादा ४७४, तळोदा २२७, नवापुर ३७९ तर नंदुरबार तालुक्यात २८८ कामे अशी एकूण २३०० कामे जिल्हयात मंजूर आहेत. या कामांवर सुमारे २ लाख ५ हजार मंजुर काम करु शकतील एवढी क्षमता आहे. परंतू जिल्हयात फक्त ४२ कामे सुरू असून फक्त ३२२ मजुर त्यावर काम करत आहेत.

## निष्कर्ष:-

नंदुरबार जिल्हयातील आदिवासीच्या स्थलांतराच्या अध्ययनावरून काही बाबी समोर आल्या त्यापुढील प्रमाणे.

जिल्हयातुन स्थलांतर करणाऱ्या आदिवासी कुटूंबाचे प्रमाण सर्वाधिक ६०% आहे. कारण दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची आकडेवारी सुध्दा जिल्हयामध्ये आदिवासी समाजाचीच जास्त आहे. जिल्हयातील एकूण गावांपैकी जवळ-जवळ ५३% गांवामधुन आदिवासी कुटूंबे स्थलांतर करतात. यात हिवाळा व उन्हाळयात स्थलांतर करणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे. तर पावसाळा या ऋतुमध्ये स्थलांतराचे प्रमाण कमी असते. यामध्ये एकूण ४४% कुटूंबांना सर्व सदस्यासहीत परराज्यात स्थलांतर करावे लागते.यात पुरूषाबरोबरच स्त्रियांचे प्रमाणही जास्त आहे.

जवळ-जवळ ३२% एवढे स्त्रियांचे प्रमाण आहे. एकूण परिस्थितीचे अध्ययनावरून जिल्हयात आदिवासी समाज आर्थिक बाबतीत मागास आहे. त्या बरोबर जिल्हयात रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध नसल्यामुळे रोजगारासाठी परराज्यात स्थलांतर करावे लागते.

**उपाय-योजनाः-**

नंदुरबार जिल्हयात आदिवासीचे स्थलांतर रोखण्यासाठी काही उपाययोजना पुढील प्रमाणे.

**१) जिल्हयात उदयोग-धंदे उभारावेतः-**

नंदुरबार जिल्हयात मोठे उदयोग धंदे, तसेच लघुउदयोग सुरू केल्यास आदिवासी मजुरांना रोजगार उपलब्ध होईल जिल्हयात आंबे, सिताफळ, पेरू यासारखे अनेक फळांचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. मिरचीचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. म्हणून यांचे प्रक्रिया उदयोग उभारावेत.

**२) फळबाग कार्यक्रम राबविणे;-**

जिल्हयातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना स्ट्रोबेरी, काजु, इतर फळबागाचे कार्यक्रम राबवावे. त्यांची लाभार्थी संख्या वाढविणे आवश्यक आहे.

**३) शेती सपाटीकरण व पुरक सुविधा पुरवाव्यातः-**

अक्कलकुवा व तळोदा तसेच धडगांव तालुक्यातील आदिवासींना वन जमिनी नावावर करून शेतजमिनी सपाटीकरण करुन दयाव्यात. तसेच शेतीसाठी पाणी पुरवठा केल्यास स्थलांतर थांबेल.

४) जिल्हयातील पर्यटन उदयोगांवर जास्तीत जास्त भर देणे नंदुरबार जिल्हयात महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ, तसेच उनपदेव, प्रकाशा, त्याच प्रमाणे विविध धार्मिक स्थळे, धबधबे या ठिकाणी पायाभुत सुविधांचा विकास केल्यास पर्यटकाची संख्या वाढून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल.

**५) रोजगार हमी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावीः-**

रोहयोतुन आदिवासी शेतकऱ्याच्या शेतीत सुधारणा करावी सपाटीकरण विहीर, लघु, जल, प्रकल्प बांध बंदिस्ती रस्ते तयार करणे ही कामे मजुरा मार्फतच करावीत व कामाचा मोबदला त्वरीत व रोख दयावा.

**६) संघटना निर्माण करावीः-**

स्थलांतर करणाऱ्या आदिवासी मजुरांनी संघटना स्थापन करावी जेणेकरुन कामावर लावणारे मालक व ठेकेदार, दलाल यांच्याकडून शोषण होणार नाही. व योग्य मोबदला मिळेल.

वरील उपाय योजनाची प्रभावी अंमलबजावणी केल्यास जिल्हयातील स्थलांतर थांबवता येऊ शकते.

**संदर्भ सूचीः-**

१) डॉ.संगवे विलास :- आदिवासी समाज
२) डॉ.गोविंद गारे :- सातपुडयातील भिल्ल
३) डॉ.फडके सुधीर :- महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न
४) नाग.डी.एस :- द ट्रायबल इकॉनॉमी
५) डॉ.गोविंद गारे :- आदिवासीच्या समस्या, विचार, आणि विश्लेषण
६) डॉ.गोविंद गारे :- आदिवासी प्रश्न
७) डॉ.गोविंद गारे :- भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती
८) नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१४-१५



**प्रा.डॉ. डी.जी. पाटील**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जी.टी. पाटील महाविदयालय,नंदुरबार.**